पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ८७० दिनांक - १४/१२/२०२३**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

## जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणा-या कात्रजच्या आरोपीस केले जेरबंद

दिनांक १२/१२/२०२३ रोजी फिर्यादी रा.आंबेगाव खु, पुणे हे त्यांना भेटलेल्या ऑर्डरचे फटाके देण्यासाठी त्यांचा भाऊ मयुर जाधव यांचेसह जैन मंदीर कात्रज, पुणे येथे गेले असता इसम नामे संकेत रेणुसे यांने फिर्यादी यांचा भाऊ निखील जाधव यांचेशी सन २०१९ मध्ये झालेल्या भांडणाचा राग काढुन फिर्यादी व त्यांचा भाऊ मयुर जाधव यास जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने फिर्यादी यांचे ओळखीचे संकेत रेणुसे, दोन विधीसंघर्षीत बालक, व इतर दोन अनोळखी मुलांनी संगनमत करुन फिर्यादी यांचे डोक्यात, पाठीवर, हातावर वार करुन फिर्यादी यांना गंभीर जखमी करुन शिवीगाळ केली, तसेच फिर्यादी यांचा भाऊ मयुर जाधव यास देखील जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्याचे डोक्यात, हातावर, पाठीवर कोयत्याने वार करुन गंभीर जखमी केले म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नंबर ८०२/२०२३, भादंवि कलम ३०७,३२३,१४३,१४४,१४७,१४८,४१९,५०४,५०६, आर्म ॲक्ट ४,२५,महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयातील आरोपी **संकेत विठ्ठल रेणुसे वय १९ वर्षे रा.सध्या ससेवाडी,शिंदेवाडी जवळ,ता.भोर,जि.पुणे व विधीसंघर्षीत बालक** याचा भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार हे शोध घेत असताना पोलीस अंमलदार,अभिजीत जाधव, विक्रम सावंत यांना त्यांचे बातमीदारामार्फेतीने बातमी मिळाली की, नमुद आरोपीत हे कात्रज तलाव येथे थांबले आहेत. लागलीच भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी कात्रज तलाव येथे जावुन नमुद आरोपीतांचा शोध घेवुन त्यांना अटक केली असुन दोन विधीसंघर्षीत बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ-०२,श्रीमती.स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विनायक गायकवाड, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.विजय पुराणिक,गिरीश दिघावकर, सहा.पोलीस निरीक्षक,अमोल रसाळ, पोलीस उपनिरीक्षक,धिरज गुप्ता, पोलीस अंमलदार,विक्रम सावंत, अभिजीत जाधव,सचिन सरपाले,शैलेश साठे,चेतन गोरे,महेश बारावकर,निलेश ढमढेरे,निलेश जमदाडे, मंगेश पवार,हर्षल शिंदे,अवधतु जमदाडे,धनाजी धोत्रे,सचिन गाडे,निलेश खैरमोडे,आशिष गायकवाड,अभिनय चौधरी,राहुल तांबे यांच्या पथकाने केली आहे.